बातमीपत्र

# पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि ०४ जानेवारी २०२६

# जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ०६/२०२६ भा.न्या.सहिता क ११८(१),३३३,३५२, ३५१(२),१८९(१), १८९(२),१९०, १९१(२), आर्म अॅक्ट ४/२५ मपोकाक १३५ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०२/०१/२०२६ रोजी १६.१५ वा चे सुमारास जोशी गल्ली, रविवार पेठ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/०१/२०२६ रोजी २२.५१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | राजुल राजु सरवदे, वय- ३२ वर्षे, रा. जोशी गल्ली, रविवार पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) दादासाहेब हरिकांत सरवदे, २) विनोद हरिकांत सरवदे, ३) बाळासाहेब पांडुरंग सरवदे, ४) रवि वसंत सरवदे, ५) श्रीकांत ऊर्फ भिड्डू वसंत सरवदे, ६) बाजीराव पांडुरंग सरवदे, ७) आदित्य दादासाहेब सरवदे, ८) अशिष शिंदे, ९) बाबा चंद्रकांत सरवदे, १०) राहुल भोसले, सर्व रा. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि. ०२/०१/२०२६ रोजी १६.१५ वा चे सुमारास, यातील फिर्यादी व इतर जखमी हे घरामध्ये असताना, आरोपीत क्रं. १ याच्या हातामध्ये तलवार व आरोपीत क्रं. २ याचे हातामध्ये कोयता, आरोपीत क्रं ३ याचे हातामध्ये कोयता, आरोपीत क्रं. ४ याचे हातामध्ये काठी, आरोपीत क्रं. १० याचे हातामध्ये फायटर घेवून फिर्यादीच्या घरामध्ये घुसुन तुम्ही आमच्या विरोधात निवडणुकीमध्ये उभे राहु नका तुम्ही फिक्स नगरसेवक स्टेटस का ठेवला तुम्हाला मस्ती आली आहे का तुमच्या मुळे आम्ही निवडणुकीत माघार घेतली आहे असे बोलून रागाने आरोपीत क्रं. ३ याने फिर्यादीच्या डाव्या बरगडीवर मारुन जखमी केले व आरोपीत क्रं. १ याने हातातील तलवारीने फिर्यादीच्या मामाचा मुलगा अमर शिंदे याला दंडावर मारुन जखमी केले आरोपीत क्रं. २ याने त्याच्या हातातील कोयत्याने फिर्यादीचा मामा तानाजी याच्या मनगटावर मारुन जखमी केले, आरोपीत क्रं. १० याने त्याच्या हातातील फायटरने फिर्यादीच्या मामाचा मुलगा यास मारुन जखमी केले त्यावेळी आरोपीत क्रं. ७ याने अतिष शिंदे यास प्लास्टीक खुर्चीने मारुन जखमी केले. आरोपीत क्रं. ५,६,८,९ यांनी फिर्यादीचा मामा शंकर, तानाजी व मामी शालन फिर्यादीच्या मामाचा मुलगा अतिष शिंदे यांना मारुन जखमी करुन, शिवीगाळ, दमदाटी केली आहे म्हणून. तपास:- मसपोनि- भांबिष्टे- ८४५९८४४४५४ |

# एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ०६/२०२६ भा.न्या.सहिता क ३१८(४),३३६(३),३२९(३),३५२,३५१(२),३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २८/१०/२०२३ रोजी ते आजतागायत, कल्पक सहकारी सोसायटी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/०१/२०२६ रोजी १७.३१ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | शाम अंबादास हंचाटे, रा. १७ जिवन ज्योती गृहनिर्माण सोसायटी आयकर नगर, रंगभवन मागे, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) शितल सुरेंद्र गायकवाड, २) सुशिल सुरेंद्र गायकवाड |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील वरील आरोपीत मजकुर यांनी फिर्यादीचे मालकीचे जागेत गेले असता फिर्यादीस शिवीगाळ दमदाटी करुन फसवणुक करण्याचे उद्देशाने हद्द कायम मोजणी करण्यासाठी बनावट व खोटी माहिती देवून चारही दिशेला त्याची स्वत:ची जमीन असल्याचे भासवून जागेची हद्द कायम मोजणी करुन घेवून बेकायदेशीरपणे १)फिर्यादीचे प्लॉट नं. ११ ब, २) मुलगा निलेश याचे प्लॉट ११अ, ३) गौरव पावले यांचे प्लॉट नं.१२ अ, ४) संतोष याटकर यांचे प्लॉट नं. १२ ब, ५) गणेश पावले यांचे प्लॉट नं. १६ अ, ६) संगय्या मठपती यांचे प्लॉटनं. १७ ब, ७) सर्वे नं. ११९/१/अ/१/१ मधील आनंद शेगुर यांचे प्लॉट न. १८, ८) सुरेखा रंगदळ यांचे प्लॉट नं. ८ तसेच खुली जागा ६४५(चौमी) या सर्व जागेवरील असलेले तारेचे कंपाऊंड काढुन फिर्यादी व इतरांचे जागेवर अतिक्रमण करुन त्याचे मालकीचे कंपाऊंड व बोर्ड लावून स्वत:चे मालकीचे असल्याचे भासवुन ती ग्राहकांना विक्री करुन फसवणुक करीत आहे म्हणून. तपास:- सपोनि- चंदनशिव- ९६२३३१४१२७ |